मुंबई मेट्रो मार्ग-१० (गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव)) (एकूण लांबी ९.६७९ कि.मी.) (५ स्थानके) या प्रकल्पास गायमुख ते फ़ाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत घोडबंदर रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरण यासह प्रकल्पाच्या सुधारीत किंमतीस राज्य शासनाची मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.१५०/नवि-७ (ई-१६३३३४४),

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २० ऑगस्ट, २०२६.

प्रस्तावना :-

मुंबई मेट्रो मार्ग-१० (गायमुख - छत्रपती शिवाजी महाराज चौक) या एकूण ९.२०९ कि.मी. लांबी (८.५२९ कि.मी. उन्नत मार्ग आणि ०.६८ कि.मी. भुयारी मार्ग) असलेल्या रु. ४४७६.०० कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पास दि. ६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. मुंबई मेट्रो मार्ग-१० चे संरेखन हे ठाणे-घोडबंदर राज्यमहामार्गाच्या मध्यभागातून जात आहे. सदर संरेखन हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून जाताना सदर रस्त्यापासून तीन ठिकाणी वळते. त्या अनुषंगाने, सदर मेट्रो मार्गिकेच्या संरेखनासाठी वन विभाग, पर्यावरण विभाग, सीआरझेड (CRZ) आणि वन्यजीव विभागाच्या परवानग्या आवश्यक होत्या. तसेच, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि तुंगारेश्वर वनक्षेत्रात राहणाऱ्या प्राण्यांच्या मुक्त संचारासाठी वन्य प्राण्यांना रस्ता ओलांडण्यासाठी उन्नत रस्ता (Animal overpass) बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार, वन्यप्राण्यांना ठाणे-घोडबंदर राज्य महामार्ग ओलांडण्यासाठी उन्नत रस्त्याचे (Animal overpass) चे संरेखन आणि योजना यासाठी इको सेन्सिटिव्ह झोनचे सीमांकन उपलब्ध करून देण्याबाबत तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामधील मेट्रो मार्गाच्या संरेखनासाठी विविध वैधानिक परवानग्यांबाबत प्राधिकरणाकडून पाठपुरावा सुरु आहे.

मुंबई मेट्रो मार्गिका १० या प्रकल्पासाठी वाढीव वृक्षतोड वाचविण्यासाठी व कामाकरिता लागणारा कालावधी कमी करण्याकरिता ०.६८ कि.मी. लांबीच्या भूमिगत मार्गिकेऐवजी पूर्णत: उन्नत मार्ग प्रस्तावित करण्यात आला असून त्यात प्राधिकरणाकडून गायमुख ते फाउंटन हॉटेल या ५.४ कि.मी. लांबीच्या रस्ता रुंदीकरणाच्या कामाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. मिरा-भाईंदर शहराचा सुधारीत विकास आराखडा तयार करण्यात येत असून भविष्यातील शहरीकरण लक्षात घेवून मौजे-चेणे येथे अतिरिक्त मेट्रो स्थानकाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. सद्यस्थितीत घोडबंदर रस्ता हा १८ ते २० मी. अरुंद व वळणावळणाचा असल्याने मेट्रोचे बांधकाम सुरु केल्यास, वाहतुकीची कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे घोडबंदर रस्त्याचे विकास आराखड्यानुसार (Development Plan) गायमुख ते फाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत ६० मीटर रुंदीकरण करण्याच्या दृष्टीने सुसाध्यता, बाधित बांधकामे आणि आवश्यक असणाऱ्या परवानग्या जसे की, सी. आर. झेड, कांदळवन, वन आणि वन्यजीव इत्यादी बाबींमुळे सदर

प्रकल्पाच्या अंमलबजावणीस विलंब झाला आहे. आता, प्राधिकरणाने सादर केलेल्या गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव) दरम्यान मुंबई मेट्रो मार्ग-१० या ९.६८ किमी लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गासह गायमुख ते फ़ाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत घोडबंदर रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरणासह मुंबई मेट्रो मार्ग-१० प्रकल्पाच्या सुधारीत किंमतीस शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहेः-

**०२. शासन निर्णय :-**

मुंबई मेट्रो मार्गिका- १० (गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव)) प्रकल्पाचे एकात्मिक, शाश्वत व कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या मेट्रो रेल प्रकल्पाच्या प्रस्तावास पुढीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) **मुंबई मेट्रो मार्गिका- १० (गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव)) एकूण लांबी ९.६७६ किमी, ५ उन्नत स्थानके असलेला एकूण रु. ७८१३.३५ कोटी** प्रकल्प पूर्णत्व किंमतीचा मेट्रो प्रकल्प आणि **मुंबई मेट्रो मार्ग-१० च्या कामासाठी गायमुख ते फ़ाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत घोडबंदर रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरण हा रु. ७१५.९१ कोटी** प्रकल्प पूर्णत्व किंमतीचा प्रकल्प असा एकूण **रु. ८५३५.४९ कोटी** किंमतीचा प्रकल्प राबविण्यास राज्य शासनाची सुधारीत मान्यता देण्यात येत आहे.

२) मुंबई मेट्रो मार्ग-१० (गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव)) एकूण लांबी ९.६७६ किमी, ५ उन्नत स्थानके असलेला मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि मुंबई मेट्रो मार्ग-१० च्या कामासाठी गायमुख ते फ़ाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत घोडबंदर रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरण या एकूण रु. ८५३५.४९ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्पाच्या किंमतीमध्ये बेंचमार्किंग दर व डीपीआर च्या दरानुसार येणाऱ्या फ़रकाबाबत स्वतंत्र आर्थिक पडताळणी करुन प्राधिकरणाने वित्तीय ताळेबंद (Financial Closure) अंतिम करावा.

४) मुंबई मेट्रो मार्गिका- १० या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची गायमुख ते फ़ाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत घोडबंदर रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरणासह उभारणी या प्रकल्पासाठी परिशिष्ट-३ मध्ये नमूद केलेल्या वित्तीय सहभागाद्वारे निधी उभारुन अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता एकूण जमिनीच्या किंमतीसाठी, राज्य शासनाच्या करासाठी आणि ५०% केंद्र शासनाचे कर यांच्या खर्चासाठी राज्य शासनाकडून रु. १००४.२३ आणि गायमुख ते फ़ाउंटन हॉटेल ६० मि. रस्ता रुंदीकरणासाठी येणाऱ्या करासाठी राज्य शासनाकडून रु. १०९.२१ बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य (subordinate debt) प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर प्रकल्पातील अतिरीक्त जमीन संपादन करावी लागल्यास तसेच, ६० मिटर रस्ता रुंदीकरणासाठी लागणाऱ्या भूसंपादन खर्चाचा आर्थिक भार हा प्राधिकरणाने उचलण्याबाबत प्राधिकरणास निर्देश देण्यात येत आहेत.

७) सदर प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर दुय्यम कर्जाची परतफेड वितरीत केल्याच्या प्रमाणात एका हप्त्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करण्याबाबत, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यात येत आहेत.

८) सदर प्रकल्पासाठी राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या बिनव्याजी दुय्यम कर्जाच्या अटी व शर्ती, मूळ रक्कमेची परतफेड आणि इतर संबंधित बाबींबाबत, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव/सचिव, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव (नवि-१) आणि महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यात पूरक वित्तीय करारनामा (Subsidiary Loan Agreement - SLA) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) मुंबई मेट्रो मार्ग-१० या प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून रु. ६२५५.६२ कोटी रकमेच्या मर्यादेत द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्था/अन्य वित्तीय संस्थामार्फत सुलभ व्याज दराचे कर्ज Back to Back Basis किंवा इतर उचित मार्गाने संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्थांद्वारे घेण्यास राज्य शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज घेण्याच्या अनुषंगाने वित्तीय संस्था निवडणे तसेच इतर पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१०) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीची प्राथमिक जबाबदारी ही प्राधिकरणाची/संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्थांची राहील.

११) सदर नमूद मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांची आकस्मिक दायित्व राज्य शासनाद्वारे स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज सहाय्यासाठी आवश्यकता भासल्यास राज्य शासनाकडून हमी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२) सदर मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य कर्ज सहाय्याच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्था आणि केंद्र शासन यांच्यात कर्ज करारनामा करण्यास तसेच संबंधित वित्तीय संस्था, राज्य शासन (नगर विकास विभाग) आणि संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था यांच्यात प्रकल्प करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१३) सदर मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य कर्ज सहाय्याच्या अटी व शर्ती, मुद्दल, व्याजाची परतफेड इ. मुद्यांबाबत अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग; अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नवि-१) व संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था यांच्यामध्ये दुय्यम कर्ज करारनामा (subsidiary Loan Agreement) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४) सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य सहाय्यित कर्ज उचलण्यासाठी मुदतवाढ देण्याची आवश्यकता भासल्यास त्यास वित्त विभागाच्या स्तरावरुन मान्यता देण्यास व केंद्रशासनास तशी विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१५) सदर प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फ़त द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांची वेळोवेळी परतफ़ेड होईल तसेच याचा भार राज्यशासनावर येणार नाही याची दक्षता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावी.

१६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सदर प्रकल्पाच्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद वित्तीय आराखड्यानुसार राज्यशासनाने सोसावयाच्या निधीपेक्षा अधिकचा निधी सदर प्रकल्पास उपलब्ध करुन देण्यात येणार नाही, याची नोंद मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी घ्यावी.

१७) देशातील विविध मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी केंद्रशासनामार्फत १०% (खाजगी गुंतवणूक, जमिनीची किंमत, पुनर्वसन व पुनर्वसाहत, राज्य शासन कर वगळून) निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचधर्तीवर या प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याकरीता राज्यशासनामार्फत पाठपुरावा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, केंद्र शासनाच्या निधी उपलब्धतेची वाट न पाहता प्राधिकरणाचा निधी वापरुन मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१८) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडेदरांस मान्यता देण्यात येत आहे. तसेच, उल्लेखीत भाडेदरांत मेट्रो रेल प्रकल्प सुरू करण्यापूर्वी प्रकल्पाची वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास, शासनाच्या पूर्व मान्यतेने, आवश्यक ते बदल करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यात येत आहेत. मेट्रो कायद्यानुसार भाडेदरात पुढील बदल करण्याचे अधिकार भाडे निर्धारण समितीला (Fare Fixation Committee) आहेत, याची नोंद घेण्यात यावी.

१९) सदर मेट्रो प्रकल्प "मेट्रो रेल्वे (कामांची बांधणी) कायदा, १९७८/"मेट्रो रेल्वे (कामांची बांधणी) कायदा, २००९" च्या तरतुदींच्या अनुषंगाने अंमलात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२०) सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व तसेच कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६/नविन केंद्रीय भूसंपादन व पूनर्वसन व पूनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत अथवा विकास हक्क/विकास हक्क हस्तांतरण यांचे माध्यमातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२१) सदर मुंबई मेट्रो मार्गिका-१० प्रकल्पाला केंद्र शासनाच्या मान्यतेस विविध प्रयोजनार्थ (उदाहरणार्थ, महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या कलम १२४B, महाराष्ट्र नगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम १४९ तसेच इतर संबंधित कायदे/नियम) “महत्त्वपूर्ण

सार्वजनिक प्रकल्प" आणि "महत्त्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२२) सदर मेट्रो प्रकल्पाच्या मार्गिकेमध्ये तसेच मेट्रो स्थानकांमध्ये गरज वाटल्यास किरकोळ बदल करण्यास, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये वाढ होत असल्यास त्यास शासनाची पूर्व मान्यता घेण्याच्या अटीवर, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२३) सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला निर्देश देण्यात येत आहेत.

२४) मेट्रो रेल्वे स्थानकांचा व्यावसायिक वापर करण्यास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनींचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यास मान्यता देण्यात येत आहे .

२५) सदर मेट्रो प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास "विशेष नियोजन प्राधिकरण (SPA)" म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२६) मुंबई मेट्रो मार्ग-१० मेट्रो प्रकल्पामध्ये असणारी बस स्थानके, रेल्वे स्थानके, इ. यांचे मेट्रो परिवहन सेवेशी एकात्मीकीकरण करण्यासाठी तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

२७) सदर प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प पुर्णत्व खर्चामध्ये किंमतवाढ, चलन विनिमय दरांतील बदल, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये बदल, डीपीआरमध्ये न दर्शविलेल्या आवश्यक बाबींचा समावेश, प्रकल्प उभारणीच्या विहीत मुदतीमध्ये वा त्यापुढे टाळता येणारा विलंब, अशा कारणांमुळे वाढ झाल्यास असा वाढीव खर्च स्थानिक प्राधिकरण, शासकीय/निम शासकीय संस्था त्यांच्याकडील जमिनी (डीपीआरमध्ये दर्शविलेल्या जमिनीव्यतिरिक्त) उपलब्ध करून घेऊन अशा जमिनीचे विकसन करून टीओडी, एफएसआय व इतर अनुषंगिक माध्यमातून निर्माण होणाऱ्या आर्थिक स्त्रोतामधून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२८) सदर प्रकल्पाच्या खर्चात कोणत्याही कारणाने वाढ झाल्यास, सदर वाढीचा संपूर्ण भार/दायित्व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावे.

२९) मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान सदर मेट्रो मार्गालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा तात्पुरता वापर करण्यासाठी तसेच संबंधित विभागांनी सदर मोकळया जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विनामूल्य उपलब्ध करून देण्यास संबंधित विभागांना निर्देश देण्यात येत आहेत.

३०) सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये दर्शविण्यात आलेल्या मेट्रो मार्गालगतच्या कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी संबंधित शासकीय / निमशासकीय

संस्थानी प्रचलित शासन नियमानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास हस्तांतरित करण्याकरीता संबंधितांना निर्देश देण्यात येत आहेत.

३१) सदर प्रकल्पाच्या खर्चात भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यामधील विलंबामुळे वाढ होणार नाही याची दक्षता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी घ्यावी.

३२) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे "समर्पित नागरी परिवहन निधी" च्या उभारणीस आणि इतर स्रोतामधून उपलब्ध झालेला निधी "समर्पित नागरी परिवहन निधी" मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३३) या प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी एमयुटीपी प्रकल्पासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१७००/सीआर-३१/स्लम-२, दिनांक १२/१२/२००० अन्वये लागू केलेले पुनर्वसन धोरण सदर प्रकल्पासही लागू करण्यात येत आहे. सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात यावे. या प्रकल्पांमधील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी नागरी क्षेत्रात ज्या ठिकाणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सदनिका उपलब्ध होत नसतील त्या ठिकाणी नगर विकास विभाग शा.नि. क्र चंमपा-२०१७/प्र.क्र.२३/न.वि.-२६ दिनांक १३/०६/२०१८ मधील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिक्रमणधारकांना एकरकमी मोबदला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३४) राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पातील प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दि.१५ मार्च, २०२४ अन्वये राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पांच्या समन्वयासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती (High Power Committee) गठीत करण्यात आली आहे. सदरहू प्रकल्प हा उच्चाधिकार समितीच्या (High Power Committee) कार्यकक्षेत आणण्यात येत आहे.

३५) महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या तरतुदींनुसार मुंबई मेट्रो मार्गिका-१० या प्रकल्पासाठी ट्रांझिट-ओरियंटेड डेव्हलपमेंट (TOD) अंमलात आणण्यासाठी तत्त्वतः मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३६) सदर मेट्रो रेल प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात अवाजवी वाढ होणार नाही व प्रकल्पाची उभारणी विहित मुदतीत करण्यात यावी, याची दक्षता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावी.

३७) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम १५ दिवसात शासनास सादर करावा.

३८) सदर प्रकल्पाचे PM Gati Shakti उपक्रमांतर्गत Network Planning Group (NPG) मार्फत परीक्षण (Scrutiny) करण्यात यावे.

३९) सदर प्रकल्प पंतप्रधान गती शक्ती पोर्टलवर अपलोड करण्याबाबत व सदर प्रकल्पास महाराष्ट्र युनिक इन्फ्रास्टक्चर आयडी (MHUID) देण्याबाबतची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी करावी.

**०३.** हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाने विभागाची ई. नस्ती क्र. १६३३३४४ वर अनुक्रमे दि. ३०/०६/२०२६ व दि. ०२/०७/२०२६ रोजीच्या टिप्पणी अन्वये दिलेले अभिप्राय व सहमतीस अनुसरुन दिनांक ०४/०८/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

**०४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२०१४३५३०४०२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.08.20 14:36:34 +05'30'

**(विजय चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ़) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
११. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
१२. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.
१४. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६. निवड नस्ती (नवि-७).

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.१५०/नवि-७, दि. २०/०८/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-१

## मुंबई मेट्रो मार्ग-१० (गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव)) प्रकल्पासह गायमुख ते फ़ाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत घोडबंदर रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरण या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

| अ. क्र. | घटक | | तपशील |
|---|---|---|---|
| १. | स्टँन्डर्ड गेज | | १४३५ मि.मी. |
| २. | मार्गाची एकूण लांबी (कि.मी) | | ९.६७९ कि.मी. |
| ३. | एकूण स्थानके | | ५ (उन्नत) |
| ४. | प्रस्तावित कार डेपो | | **मुंबई मेट्रो मार्गिका-४ व ४ अ साठीचा मोघरपाडा येथील कारडेपो** |
| ५. | प्रकल्पासाठी आवश्यक जमीन | कायमस्वरूपी | ३.७३ हे. |
| | | तात्पुरती | ४.४० हे. |
| ६. | प्रकल्प राबविण्याचा कालावधी | | एप्रिल, २०२५ ते मार्च, २०३० (प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाल्यापासून ५ वर्षे) |
| ७. | जमिनीची किंमत (मूळ) (रू. कोटी) | कायमस्वरूपी | २०१.८० |
| | | तात्पुरती | १७.६ |
| ८. | दरवाढ @५% प्रतिवर्ष (रू. कोटी) | | १,१०१.८६ |
| ९. | बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज (IDC) (रू. कोटी) | | ३८.४३ |
| १०. | गायमुख ते फ़ाउंटन हॉटेल दरम्यान ६० मि. रुंदीकरणाची किंमत | | ७१५.९६ |
| ११. | प्रकल्प पूर्णत्वाची मूळ किंमत (जमिन व सर्वकरांसहीत) (रू. कोटी) | | ८५३५.४९ |
| १२. | वित्तीय अंतर्गत परतावा दर मालमत्ता विकासासह (FIRR) | | **७.८६%** |
| १३. | आर्थिक अंतर्गत परतावा दर (EIRR) | | **२२.९५%** |
| १४. | प्रवासी क्षमता (६ डब्यांची मेट्रो रेल गाडी) | | १. ६ प्रवासी प्रतिवर्ग मीटर (सामान्य) प्रमाणे: १३६८ प्रवासी क्षमता.<br>२. ८ प्रवासी प्रतिवर्ग मीटर (क्रश) प्रमाणे: २३५२ प्रवासी क्षमता. |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.08.20 14:36:59 +05'30'

**(विजय चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.१५०/नवि-७, दि. २०/०८/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-२

### मुंबई मेट्रो मार्ग-१० (गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव)) प्रकल्पासह गायमुख ते फ़ाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत घोडबंदर रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरण या प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील

| अ.क्र | घटक | रक्कम | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | स्थापत्य कामाचा एकूण खर्च | १४०४.१७ | १७.९६% |
| २. | एकूण प्रणाली खर्च | ३६१२.१५ | ४६.१९% |
| ३. | एकूण डिझाइन कामाची किंमत (अ.क्र. १ + २) | ५०१६.३१ | ६४.१५% |
| ४. | सामान्य शुल्क | २५२.७१ | ३.२३% |
| ५. | आकस्मिक शुल्क @ ३% | १६५.७९ | २.१२% |
| ६. | एकूण कर | ९८७.०८ | १२.६२% |
| ७. | बांधकाम कालावधी (आयडीसी) दरम्यान व्याज | ३८.४३ | ०.४९% |
| ८. | जमिनीची एकूण किंमत आणि पुनर्वसन | २५७.३४ | ३.२९% |
| ९. | दरवाढ | ११०१.८६ | १४.०९% |
| १०. | मेट्रो संरेखनाची एकूण किंमत | **७८१९.५३** | **१००.००%** |
| ११. | गायमुख ते फ़ाउंटन हॉटेल ६० मि. रस्ता रुंदीकरणाची एकुण किंमत | ७१५.९६ | -- |
| **१२.** | **एकूण प्रकल्प खर्च** | **८५३५.४९** | **--** |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.08.20 14:37:11 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.१५०/नवि-७, दि. २०/०८/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

## परिशिष्ट-३

## मुंबई मेट्रो मार्ग-१० (गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव)) प्रकल्पासह गायमुख ते फ़ाऊंटन हॉटेल (५.४ किमी) पर्यंत घोडबंदर रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरण या प्रकल्पाचा वित्तीय सहभाग आराखडा

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये (कोटी) | सहभागाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग | ५५९.६७ | २० % |
| २ | राज्य शासनाचा सहभाग (एकूण जमिनीची किंमत+राज्य शासनाचा कर+५०% केंद्र शासनाचा कर) या करीता राज्य शासनाचे बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य | १००४.२३ | |
| ३ | द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/अंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज सहाय्य | ६२५५.६२ | ८०% |
| ४ | **मुंबई मेट्रो मार्ग-१० प्रकल्पाची एकूण प्रकल्प किंमत (१+२+३)** | **७८१९.५३** | **१००%** |
| ५ | गायमुख ते फ़ाउंटन हॉटेल ६० मि. रस्ता रुंदीकरणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग | ६०६.७४ | -- |
| ६ | गायमुख ते फ़ाउंटन हॉटेल ६० मि. रस्ता रुंदीकरणासाठी येणाऱ्या करासाठी राज्य शासनाचे बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य | १०९.२१ | -- |
| ७ | मुंबई मेट्रो मार्ग-१० आणि गायमुख ते फ़ाउंटन हॉटेल ६० मि. रस्ता रुंदीकरणासह प्रकल्प किंमत | ८५३५.४९ | -- |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.08.20 14:37:23 +05'30'

(विजय चौधरी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.१५०/नवि-७, दि. २०/०८/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

## परिशिष्ट-४

**प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्त्रोत :-**

a. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम सदर मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेकडे/ राज्य शासनाच्या नागरी परिवहन निधिमध्ये वर्ग करणे.

b. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदींनुसार महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात विकास शुल्कात १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यातील तरतूदीनुसार महानगरपालिका/नियोजन प्राधिकरण क्षेत्रात वसूल होणाऱ्या रक्कमेमधून सदर वाढीव विकास शुल्काची रक्कम राज्य स्तरावरील नागरी परिवहन निधीमध्ये वर्ग करणे.

c. महत्वाकांक्षी नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात मालमत्तेचे मुद्रांक शुल्कासोबतच १ टक्के अधिभार लावण्याची तरतूद सन २०१५ चा अधिनिमय क्र.३५ दिनांक २१.०८.२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४९ ब मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर प्रयोजनातून प्राप्त रक्कम विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी वापरणे.

d. मेट्रो कार डेपोच्या जागा तसेच प्रकल्प अंमलबजावणी संस्थेला हस्तांतरीत जमिनींच्या वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

e. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या आगमन/निर्गमन ठिकाणी, स्थानकांच्या नावांचे ब्रँडींग, डेपो, स्थानकांवरील जाहिरात तसेच ट्रेन कोचेस रॅपिंग च्या माध्यमातून जाहिरात व पार्कींगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

f. मेट्रो स्थानकांवर स्थित किऑस्क, एटीएम सेंटर्स इ. माध्यमातून मिळणारे उत्पन्न.

g. सदर विविध स्त्रोतांतून प्राप्त होणारा निधी हा एका "समर्पित नागरी परिवहन निधीमध्ये" जमा करावयाचा असून तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी प्रकल्प अंमलबजावणी संस्थेस वापरण्यास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

प्रचालनादरम्यान मालमत्ता व्यवसाय आणि जाहिराती यांद्वारे तिकीट भाड्यामधून प्राप्त महसुलाच्या १०% इतके उत्पन्न अंदाजित केले गेले आहे. मेट्रो स्थानकांवरील आणि कार डेपोवरील मालमत्तेचा विकास करणे, स्थानकांवरील पार्किंग हक्कांचे लीजिंग, कोचेस आणि तिकिटांवर जाहिराती, स्थानकांमध्ये आणि पार्किंग लॉट्समध्ये जाहिराती, व्हायडक्ट्स, कॉलम्स आणि इतर मेट्रो संरचनांवर जाहिराती, कॉर्पोरेट क्षेत्रासाठी को-ब्रँडिंग आणि नामकरण हक्क, मेट्रो परिसरामधील चित्रपटांचे चित्रीकरण आणि विविध विशेष कार्यक्रमांच्या (Events) आयोजनाद्वारे संसाधने उभारण्यात येतील.

VIJAY KARBHARI
CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8ba
dbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424
118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.08.20 14:37:36 +05'30'

**(विजय चौधरी)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२५/प्र.क्र.१५०/नवि-७, दि. २०/०८/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट-५**

**मुंबई मेट्रो मार्ग-१० (गायमुख ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (मिरागाव)) या प्रकल्पाची तिकीट भाडे संरचना**

वाहन सर्वेक्षण आणि प्रवासी संख्या अंदाजासाठी विचारात घेतलेल्या भाडे संरचनेचा वापर प्रकल्पाच्या FIRR (Financial Internal Rate of Return) च्या गणनेसाठी मूलभूत भाडे म्हणून केला गेला आहे. FIRR गणनेसाठी विद्यमान भाडे संरचनेवर दर दोन वर्षांनी १०% चा वाढीचा घटक लागू करण्यात आला आहे, जो किंमतीच्या निर्देशांकातील सरासरी कल (Trend) आणि परिचालन खर्चाच्या माहितीवर (Input) आधारित आहे.

| **अंतर (किमी)** | ०-३ | ३-६ | ६-९ | ९-१२ | १२-१८ | १८-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| **२०३१ मध्ये भाडे** | १० | २० | ३० | ४० | ५० | ६० |

वरील भाडे दरांच्या आधारे, मेट्रो रेल प्रकल्पाच्या प्रारंभापूर्वी, प्रकल्पाच्या आर्थिक कार्यक्षमतेची तपासणी करण्यात येवून आणि आवश्यक असल्यास, शासनाची पूर्व परवानगी घेऊन आवश्यक ते बदल केले जातील. मेट्रो कायद्यानुसार, भविष्यकालीन भाडे दरात बदल करण्याचे अधिकार भाडे निश्चिती समितीकडे (Fare Fixation Committee) आहेत.

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C5748B6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.08.20 14:37:54 +05'30'

**(विजय चौधरी)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**